213

प्रति,

मा. आमदार निलेशजी लंके साहेब.

पारनेर- नगर विधानसभा मतदार संघ.

विषय:~ अक्कलवाडी गावातील विविध समस्या बाबत व विविध विकास कामे मंजुर होणेबाबत....

माननीय महोदय

वरील विषयानुसार आपणास विनंती पूर्वक अक्कलवाडी हे गाव आपणास माहिती व परिचयाचे आहे पठारभागात वसलेले गाव असुनही काही समस्या अनेक वर्षा पासुन प्रलंबित आहेत तरी त्या पुढील प्रमाणे व ती कामे महोदय आपल्या स्तरावरुन निराकरण होवे व विकास कामे मंजुर व्हावी ही नम्र विनंती...

A

१)अक्कलवाडी ते ठाकरवाडी हा रस्ता ४०-५० कुटुंबाचा रहदारीचा असुन हा रस्ता हा मागील वर्षी अक्कलवाडी गावठान ते बुरुंजवस्ती ०१ किलोमीटर हा रस्ता आपल्या मार्फत पूर्ण झाला असुन व बुरुंजवस्ती ते ठाकरवाडी हा रस्ता.२ किलोमीटर बाकी असुन तो रस्ता आपल्या सहकार्य मधुन खडीकरण व डांबरीकरण रस्ता मंज़ूर व्हावा ही नम्र विनती.

B

2)पारधूत ते बंगाळी मटकमाल शिवारवाहनी /शेतपानमंद हा रस्ता २.५ किलोमीटर असुन काही वर्षा पासुन प्रलंबित आहे त्या रस्त्यानी ग्रामस्थाना आपल्या शेतात १२ ही महीने बैलगाड़ी , ट्रैक्टर बैल अवजारे घेवून जावे लागते व हा रस्ता खराब असल्यामुळे शेतात जाता येत नाही पावसाल्यात रस्ताची पारस्थिति ख़राब होते हा रस्ता मज़बूतीकरण व खडीकरण होने अत्यंत गरजेचे असुन हा रस्ता लवकर मार्गी लावावा जेने करुण शेतकारी राजा आपल्या शेतात सुखरूप बैलगाड़ी ,इतर वाहन घेवून जावु शकेल व शेतीची कामे योग्य प्रकारे होईल.

3)अक्कलवाडी गावातील मटकमाल - ०२, बुरुंजवाडी- ०३, पावडेवस्ती -०२, मारोगवस्ती -०२, वस्ती ही गावापासून दूर आहे व त्या वस्ती वर स्टेट लाईट उपलब्ध करुण द्यावे ही नम्र विनती.

4)अक्कलवाडी मध्ये बुरुंज वस्ती या ठिकाणी ५०/६० लोकसंख्या राहते त्या ठिकाणी त्याना लाइट् समस्या जास्त प्रमाणामध्ये येते त्यासाठी त्यांची समस्या दूर होनेसाठी त्याना एक ट्रान्सफार्मर (डीपी) उपलब्ध करुण दयावे ही नम्र विनतीं.

5) मोरधूत (अक्कलवाडी) या ठिकाणी केटीवेअर बांधने.

6) बंगाळी (बाभुलवाडे)या ठिकाणी केटीवर बांधने.

६) अक्कलवाडी गावात लहान बालकांसाठी गार्डन व खेलन्याचे साहित्य उपलब्ध करावे.

वरील प्रमाणे गावातील नागरिकांचे अतिमहत्वाचे समस्या असुन त्या लवकरात लवकर निराकरण होणे गरजेचे आहे व

आपण पारनेर नगर विधानसभा मतदार संघातील अक्कलवाडी गावातील समस्या चे निराकरण करुण नमूद विकासकामे मंज़ूर करावे ही विंनती.

अद्यक्ष/उपाध्यक्ष

(बालासाहेब गोपाला नरवडे)

बाळासाहेब गोपाळा नरवडे.